**<u>लेखिका: डॉ. श्रुती अशोक भामरे</u>**

**<u>लघुकथा: फक्त लढ म्हणा!</u>**

नायर हॉस्पिटलच्या वॉर्ड नंबर तीन मधून डॉक्टर आज खांदे पाडून बाहेर निघाला. त्याची कोरोना ड्यूटी नुकतीच संपली होती. अंगावर चढवलेले पी.पी.ई. रुपी चिलखत त्याने कसेबसे काढले होते आणि घामाने निथळलेले कपडे बदलले होते. सहा तास मुंबईच्या भयाण उकाड्यात पाण्याचा एक घोट डॉक्टरला पिता आला नव्हता. शरीरातील सगळे पाणी जणू घाम होऊन बाहेर पडल्याने डोके घणाचे आघात झाल्यासारखे ठणकत होते. ड्यूटीमध्ये लघवीलादेखील न गेल्याने परिस्थिती हातघाईवर आली होती. रात्रीच्या सलग जागरणाने डोळे चुरचुरत होते. पण रूम समोर येतायेता डॉक्टरची झोप उडाली. कोरोना ड्यूटी लागल्यापासून डॉक्टर नायर हॉस्पिटलच्या कॅम्पसमध्येच रहायला आला होता. मुंबई सेंट्रल स्टेशनजवळचा त्याचा फ्लॅट त्याला सोडावा लागला होता. अजूनही घरमालकाचे शब्द डॉक्टरच्या कानात घुमत होते, "माझं काही म्हणणं नाही डॉक्टर! या अशा परिस्थितीत डॉक्टरला काम करावंच लागणार. डॉक्टर नाही तर कोण करणार काम? पण बाकीचे भाडेकरू पण सांभाळावे लागतात मला. त्यांचं म्हणणं पडलंय की तुमच्यामुळे सगळ्या सोसायटीत पसरेल कोरोना. नाही, तुम्ही काळजी घ्याल च हो! पण कशाला बाकीच्यांना आजाराचा धोका ना? सतत त्यांच्या डोक्यावर टांगती तलवार राहणार कोरोना डॉक्टर आजूबाजूला असला म्हणजे! त्यापेक्षा तुम्ही हॉस्पिटलमध्येच रहा ना, चांगली रुग्णसेवा करा. नायरलाच आहात ना सध्या? तुमचा नंबर घेतो. कोणी नातेवाईक आला पॉझिटिव्ह तर सरळ तुमच्याकडे पाठवेन. तुम्ही तर आधार आहात आता देशाचा, तुमच्यावरच आहे हो आमची जबाबदारी. आमचे कोरोना वॉरियर्स आहात तुम्ही डॉक्टर!"

हे सगळं बोलणं आठवलं आणि डॉक्टर खिन्न हसला. आजवर ज्या सोसायटीला डॉक्टर म्हणून आपला आधार वाटत होता, तिथे आता आपण एक नकोनकोशी अडचण वाटत आहोत, हे त्याला कळून चुकलं होतं. हे सगळं झालं कोरोनामुळे. या एका विषाणूने मुंबईकर बदलले आणि मुंबईसुद्धा. मुंबईची वर्दळ आणि धावपळ यांना कोरोनाने क्षणार्धात ब्रेक लावले. बघता बघता कोरोनाने सगळं शहर थांबवलं, देशच थांबवला म्हणा ना! सगळ्या भारतीयांसमोर घरी राहणे आणि टी. व्ही. वरच्या बातम्यांतून कोरोनाचे देशविदेशातील थैमान पाहणे एवढंच काम उरलं. भारतात तर या आजाराचं राजकारण पराकोटीच्या हीन थराला जाऊन पोहोचलं. धर्माला या राजकारणात गोवलं गेलं. प्रादेशिक अस्मितेचा उद्धार झाला. वेगवेगळे राजकीय पक्ष या तापलेल्या तव्यावर पुढच्या निवडणुकीची पोळी भाजण्यासाठी सरसावले. या युद्धात खर्ची पडला, तो मात्र सामान्य माणूस. लोकांनी पगारवाढ गमावली, बढत्यांची शक्यता गमावली, नोकऱ्याही गमावल्या. घरांचे हफ्ते भरता न आल्याने घरं सोडली. भविष्यातली अनिश्चितता आणि वर्तमानकाळतली निष्क्रियता या दुहेरी नकारात्मक परिस्थितीचा अतिशय विपरीत परिणाम लोकांच्या मानसिक आरोग्यावर झाला. अतिविचार, अतिरिक्त चिंता आणि काहीशी जाचक अशी लादली गेलेली सततची जवळीक यामुळे लोकांचं मनःस्वास्थ्य हरवलं. कामात गुंतलेलं चित्त आता नको नको ते विचार करायला मोकळं झालं होतं. त्यात

आपलं वाचवलेलं, सांभाळलेलं, जतन केलेलं संचित कणाकणाने संपत चाललं. गरिबांच्या गरजा भागेनाशा झाल्या आणि श्रीमंतांची हाव संपेनाशी झाली. वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये ज्यांचा गडगंज पैसा गुंतलेला होता, त्यांनी एका दिवसात शेयर बाजार जमीनदोस्त होताना पाहिला. देशाची अर्थव्यवस्था वाऱ्याची झुळूक लागून पत्त्यांचा बंगला कोसळतो तशी अक्षरशः कोसळली, मोडकळीस आली. देशातील गरीब आणि असुरक्षित लोकांना या विषाणूचा सगळ्यात वाईट धक्का बसला. घरी राहून सुरक्षित राहणे त्यांना परवडण्यासारखे नव्हते. सरकारने देऊ केलेली मदत आपल्यापर्यंत पोहोचेल की नाही, याची काहीच शाश्वती नव्हती. लपतछपत घरातून बाहेर पडून कामावर जाणे, प्रसंगी पोलिसांचा लाठीमार झेलूनही नोकरी टिकवणे त्यांना भाग होते. रोजच्या कमाईच्या बळावर ज्यांच्या घरी चूल पेटणार, त्यांनी पोटातल्या भुकेला कोरोना कसा समजावून सांगायचा?

शहरातील कंत्राटी कामे करणारे असे कित्येक मजूर कोरोनामुळे देशोधडीला लागले. आपापल्या गावी परतण्यासाठी ते सहकुटुंब अक्षरशः पायपीट करत निघाले. मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी भीक मागण्याची वेळ त्यांच्यावर आली. आतून पोखरलेले शरीर आणि हरलेले मन अशा दुहेरी धोक्यामुळे कोरोनाचे सावटही गरीब जनतेवर लवकर पडले. मुंबईमध्ये तर ज्या दिवशी धारावीच्या झोपडपट्टीत पहिला कोरोना रूग्ण सापडला, त्या दिवशी जणू आरोग्य संस्थांच्या हृदयाचा ठोकाच चुकला. माणसांनी तुडुंब भरून वाहणारी धारावी..घरांऐवजी जणू खुराड्यांमध्ये माणसं कोंबून कोंबून बसवलेली धारावी..स्वच्छता, पौष्टिक जेवण, कचरा व्यवस्थापन यांचा लवलेशही नसलेली धारावी.. दरवर्षी पावसाळ्यात हगवण, मलेरिया, डेंग्यू आणि क्षयरोगाच्या रूग्णांनी मुंबईचे प्रशासन जेरीस आणणारी धारावी..अशा या धारावीमध्ये कोरोनाचा शिरकाव झाला. आधीच अपुरा निधी मिळणारे दुर्लक्षित असे भारताचे आरोग्य क्षेत्र, त्यावर असे भयंकर संकट आल्यावर व्हायचे तेच झाले. वाढत्या लोकसंख्येला अनुसरून ना सार्वजनिक रूग्णालये वाढली होती, ना आरोग्य कर्मचारी वर्ग. आता आणीबाणीची परिस्थिती आल्यावर, आहेत त्या सोयी-सुविधांच्या बळावर काम करणे, एवढेच शासकीय रूग्णालयांच्या हातात उरले. शिक्षक, विद्यार्थी, इंटर्न डॉक्टर्स, नर्सेस असा होता-नव्हता तो सगळा आरोग्य कर्मचारी वृंद कोरोना रूग्णांच्या सेवेत दिवसरात्र न पाहता झटू लागला. संशयित रुग्णाची चाचणी करणे आणि रिपोर्ट पॉझिटिव येताच रूग्ण दाखल करून घेणे असा सपाटा मुंबईच्या सगळ्या शासकीय रुग्णालयांमध्ये लागला. त्यात डॉक्टरचे नायर हॉस्पिटल तर कोविड हॉस्पिटल म्हणून जाहीर करण्यात आले. खरं तर या आरोग्य क्षेत्रासाठी कसोटीच्या काळात आपल्याला भरीव योगदान देता येत आहे, याचा डॉक्टरला खूप आनंद वाटला होता. रूग्ण सेवेसाठी घेतलेली हिपोक्रेटिक शपथ आचरणात आणण्याची ही वेळ होती. अतिशय जोमाने सगळे आरोग्य कर्मचारी हाती लागलेल्या आयुधांच्या मदतीने कोरोनाविरूद्ध लढत होते. त्यांना अपेक्षित होता थोडासा सहानुभाव, आदर आणि सहकार्य. बस्स! या मागणीत काय गैर होतं?

डॉक्टरला रात्रीची ड्यूटी पुन्हा एकदा आठवली आणि तो विषण्ण झाला. एव्हाना त्याची थकलेली पावलं त्याला रूमपर्यंत घेऊन आली होती. रूमच्या दरवाजाजवळ त्याला मेसच्या काकूंनी आणून ठेवलेला डबा

दिसला. दोन महिने मेसचं तेच अळणी सपक जेवण जेवून डॉक्टरला आता उबग आला होता. पण क्वारंटाईन मध्ये एकटं रहायचं म्हणजे रोजच्या जेवणाची याहून चांगली सोय शक्य नव्हती. बाहेर जेवायला जावं म्हटलं, तर तशी सोयच नव्हती. संचारबंदीच्या नियमांनुसार सगळ्या खानावळी व हॉटेल्स बंद करण्यात आलेली. घरपोच डिलिव्हरीही बंद होती. किंबहुना जीवनावश्यक वस्तू सोडल्यास कुठल्याही सोयीसुविधा उपल्बध नव्हत्या. मुंबईच नव्हे तर देशभरात आणि जगभरात थोड्याफार फरकाने हेच नियम लागू झाले होते. या नवीन आजाराविषयी फारशी माहिती उपलब्ध नसल्याने सरकारसमोर प्रसार थांबवण्याचा 'संचारबंदी' एवढा एकच उपाय होता. लोकांना मात्र ही संचारबंदी मानवली नाही. "मोठ्या शहरांमध्ये लावा की तुमची ही बंदी, तिथल्या लोकांनीच आणला कोरोना. आमच्या गावात रूग्ण नसताना आम्हाला का शिक्षा?" असे अत्यंत बौद्धिक युक्तिवाद घराघरात झाले. मुंबई-पुण्यातले रूग्णांचे आणि कोरोना बळींचे वाढते आकडे ऐकून मात्र भलेभले लोक ताळ्यावर आले. संचारबंदी लागू झाली आणि घरोघरी वेळ घालवण्यासाठी स्वयंपाकघर, वाचनालय, टी.व्ही. आणि मोबाईल यांचा विनियोग वाढला. वेगवेगळे खाद्यपदार्थ, चित्रकला, मेंदी, पुस्तकवाचन, केशरचना, रंगरंगोटी इ. फोटो फेसबुकवर तासामाजी येऊ लागले. लॉकडाऊनचा वेळ सत्कारणी लावण्याचीही स्पर्धाच जणू लागली होती. कसेही असो, पण लोक "घरी रहा, सुरक्षित रहा" हा आदेश पाळण्याचा प्रयत्न करत होते. पण सामान्य माणसाला स्वतःचा जीव वाचवण्यासाठी जी मुभा होती, ती डॉक्टर्स, पोलिस, सफाई कर्मचारी, भाजीपाला विक्रेते, शासकीय कर्मचारी आणि मिडियाचे लोक या कोरोना वॉरियर्स ला नव्हती. इतर सगळे आहे त्या साधनसामग्रीचा वापर करून आपापले कर्तव्य चोख पार पाडण्यासाठी झटत असताना काही बातमीदार मात्र breaking news बनवण्यासाठी आपण किती कोरोना वॉरियर्सचं morale break करतोय, याचा सारासार विचारही करत नव्हते. या बातमीदारांच्या शाब्दिक वारांना तोंड देणे आणि प्राप्त परिस्थितीची त्यांना जाणीव करून देणे, हे आरोग्य कर्मचारी वर्गाला ड्यूटीपेक्षा मोठे दिव्य वाटले, तर नवल नव्हते. कोरोना वॉर्डमध्ये काम केलेले आपले अनेक सहकारी डॉक्टर आणि स्टाफ कोरोना पॉझिटिव्ह आल्याने त्यांच्या आरोग्याला आणि कुटुंबियांनाही धोका निर्माण झाला होता. तरी प्रत्येक सरकारी आरोग्य कर्मचारी आपल्या कामावर रोज हजर होत होता. हॉस्पिटलमध्ये पुरेशी जागा नसणे, रूग्णांसाठी सोयीसुविधा नसणे, पुरेसे मनुष्यबळ नसणे, यात 'निदान आणि उपचार' एवढीच जबाबदारी आणि अखत्यारी असलेल्या डॉक्टरची काय चूक होती? पण घडत असलेल्या सर्व अन्यायाचं खापर कोणावर तरी फोडणे गरजेचे होते. संतापलेल्या जनतेला आणि जनतेच्या कैवारी मिडियाला डॉक्टर आयतेच सापडले होते. या बातम्या प्रसारित झाल्याने लोकांना डॉक्टर्सबद्दल वाटणारा अविश्वास वाढत होता आणि सोबतच डॉक्टर्सवरचे हल्लेसुद्धा. आपल्याबरोबर शिकलेल्या काही डॉक्टर्सवर झालेल्या हल्ल्यांबद्दल ऐकून डॉक्टरला काळजी वाटली होती. पण सरकार या घटनांची पुरेशी दखल घेत नव्हते. न्यायदेवततेनेही जणू डोळ्यांवर पट्टी बांधून डॉक्टर्सच्या जखमांकडे दुर्लक्ष केले होते, नेहमीसारखे!

डब्याला हात लावल्यावर डॉक्टरला आतले जेवण थंडावल्याचे जाणवले. तो डबा उचलून डॉक्टर रूममध्ये आला. थंडगार झालेलं ते जेवण त्याने तसंच बाजूला सारलं. फॉर्म्स, स्टेथो, हॅमर, टॉर्च असं काहीबाही

कोंबलेल्या एप्रनच्या खिशात हात घालून चाचपडत डॉक्टरने फोन बाहेर काढला. रूममध्ये एका कोपऱ्यात टाकलेल्या गादीजवळ तो गेला. बेडशीटवरच्या चहा-कॉफीच्या एव्हाना फिकट झालेल्या डागांकडे कसंनुसं पाहत तो त्याच्या गादीवरच्या पुस्तकांच्या ढिगात जेमतेम बसला अन् आईने फोन उचलायची वाट पाहू लागला. "संपली का आजची ड्यूटी?" आईचा प्रश्न येताच डॉक्टरचे डोळे भरून आले. "काय चाललंय काही कळत नाहीये आई. मुंबईची परिस्थिती फार भयानक आहे गं. आज तीस नवीन कोरोना केसेस आल्या. बेडमागून बेड, वॉर्डमागून वॉर्ड भरत चालले आहेत. हॉस्पिटलचा एकूण एक कर्मचारी कोरोनाच्या महायुद्धात लढतोय, पण हा आजार हरत नाही आई. किड्यांमुंग्यांसारखे पेशंट जीव गमावत आहेत. सगळे वेंटिलेटर कुठल्या ना कुठल्या पेशंटला मृत्यूच्या दाढेतून काढण्यासाठी झगडत आहेत. काही करता येत नाहीये आई, हताश वाटतंय गं!" डॉक्टरचं हे बोलणं ऐकून आईचे डोळे पाणावले. आपला मुलगा मुंबईला गेला, डॉक्टर झाला, त्याचं सर्जरीचं शिक्षण पूर्ण होत आलं, याचं त्या माऊलीला कोण कौतुक होतं. यंदाच्या वर्षी छानशी डॉक्टर मुलगी बघून साखरपुडा करून टाकायचा, असा तिचा विचार ठरेपर्यंत मुंबईत कोरोना विषाणू आला. त्या बिचाऱ्या माऊलीला कोरोना नीटसा कळालादेखील नव्हता. टी. व्ही. वरच्या बातम्या पाहून मुंबईची दुःस्थिती आणि आपल्या बाळाला असलेला या आजाराचा धोका तेवढा तिला कळत होता. या अशा धोक्याच्या परिस्थितीतही आपला मुलगा प्राण पणाला लावून आपलं काम करतोय, याचं कौतुक मात्र त्या माऊलीची मान उंचावत होतं व कणा बळकट करत होतं. डॉक्टरनेही आईला आपल्या समस्या आणि तक्रारी सांगायच्या नाही, असं पक्कं ठरवलं होतं. पण.. पण आजचा दिवस वेगळा होता.

डॉक्टरने फोन हातात घट्ट पकडत पुन्हा बोलायला सुरुवात केली, "आज तर कहर झाला आई. तीन रूग्ण दगावले माझ्या ड्यूटीमध्ये. माझ्यासमोर. नाही वाचवता आलं गं आई. खूप प्रयत्न केले आम्ही. पण, दाखल करून घेतानाच क्रिटिकल होते त्यातले एक आजोबा. सत्तरी ओलांडलेली. डायबिटीस होता त्यांना अठ्ठाविस वर्षांपासून. प्रकृती इतकी खालावलेली. त्यात हा कोरोना झाला. घरी आजोबा आजी दोघंच. आजीच आल्या होत्या आजोबांना घेऊन हॉस्पिटलमध्ये. आधी त्यांना वाटलं होतं की, कोरडा खोकला आहे. दोन-तीन दिवस गरम पाणी प्यायलं, आल्याचा चहा घेतला की वाटेल बरं. शेवटी श्वास घेता येईना आजोबांना, तेव्हा आजी घाबरल्या आणि आणलं त्यांना नायरला. तोवर आजींनाही झालाच होता कोरोना. दोघं खूप घाबरली निदान झाल्यावर. मीच होतो तेव्हा ड्यूटीवर. दोघांना समजावून सांगितलं मी कोरोनाविषयी, आणि लगोलग दाखल करून घेतलं. आजी त्यातल्या त्यात कणखर होत्या, म्हणून त्यांना पाहणी आणि मूलभूत उपचारासाठी वेगळ्या वॉर्डमध्ये ठेवलं आम्ही. आजोबांची परिस्थिती नाजूक होती म्हणून त्यांना क्रिटीकल केअर उपलब्ध असलेल्या वॉर्डमध्ये ठेवलं. आजी अधूनमधून विनंती करायच्या आजोबांना भेटायला येऊ का म्हणून. पण आजोबांची तब्येत फार झपाट्याने खालावली होती. कृत्रिम ऑक्सिजन सपोर्ट देऊनही त्यांच्यात सुधारणा झाली नाही. एका रात्री तर त्यांना श्वासोच्छ्वास करताना इतका त्रास होऊ लागला की, मी श्वासनलिकेत नळी घालून त्यांना व्हेंटिलेटरवर घेतलं. बाकी सगळं सोपं आई, पण कोरोनाचा रूग्ण व्हेंटिलेटरवर गेला की, आमची आशाही डळमळीत होते. मी तरीसुद्धा डोळ्यांत तेल घालून आजोबांचं मॉनिटरिंग करत होतो. त्यांचं ऑक्सिजनचं प्रमाण मात्र ढासळत चाललं होतं.

आजींना ही बातमी द्यायचाही मला धीर झाला नाही. त्यांनी मला आजोबांविषयी विचारलं की मी "आम्ही प्रयत्न करतोय" असं तुटक उत्तर द्यायचो. दरम्यान आजींची तब्येतही हळूहळू बिघडत गेली. त्यांना दम्याचा आजार होता, त्यामुळे श्वसनसंस्था मुळातच नाजूक होती. शेवटी त्यांनाही मी कृत्रिम ऑक्सिजन सपोर्टवर घेतलं. अशा बिकट परिस्थितीतही स्वतःची पर्वा न करता आजी माझ्याकडे आजोबांचीच चौकशी करायच्या. त्यांच्या वॉर्डमध्येच ठेव रे मला, अशी विनवणी करायच्या. मी मात्र आजींना कधीच त्या क्रिटीकल केअर वॉर्डमध्ये यावं लागू नये, अशीच प्रार्थना करत होतो.

काल रात्री मी पी.पी.ई. घालून ड्यूटीसाठी तयार झालो. वॉर्डात गेल्याबरोबर ड्यूटीवर असलेल्या नर्सने मला सगळ्या रूग्णांचा धावता अहवाल दिला. मी मग वॉर्डमध्ये राऊंड घेतला आणि प्रत्येक रूग्णाची फाईल पाहून औषधांची मात्रा गरजेनुसार कमी-जास्त केली. देवाच्या कृपेने कुठल्याही नवीन रूग्णासाठी व्हेंटिलेटरची गरज भासली नव्हती. कोरोनामुळे नायर हॉस्पिटलमधला प्रत्येक व्हेंटिलेटर आता वापरात होता. मी माझा राऊंड संपवून रूग्णांच्या फाईल्स मध्ये नोंदी करू लागलो. औषधांच्या ट्रॉलीजवळ नर्स आणि वॉर्डातील मामा काही रूग्णांसाठी अझिथ्रोमायसिन इंजेक्शन तयार करत होते. तेवढ्यात आमच्या वॉर्डमध्ये एक स्ट्रेचर शिरला. मामांनी रूग्णाला बेडवर घेतले आणि मला हाक मारली. मी आणि नर्स त्या बेडकडे धावलो. पाहतो तर काय, आजी! त्यांचा जीव गुदमरला होता. श्वासोच्छ्वास अतिशय उथळ झाला होता. त्यांच्या बोटाला नर्सने ऑक्सिजन मॉनिटर लावला. स्क्रीनवरचा आकडा पाहून माझं अवसान गळालं. ऑक्सिजनचं प्रमाण खूप खालावलं होतं. नर्स माझ्याकडे पाहत म्हणाली, "सर, पेशंट बॅड झाली आहे. फेल्युअर मध्ये जाईल. इंट्युबेशन किट आणू का?" मला काही सुचेना. श्वसननलिकेत कृत्रिम नळी घातली, तरी व्हेंटिलेटर कुठे होता आजींसाठी? मी काही बोलणार तेवढ्यात आजोबांच्या बेडपाशी उभ्या मामांनी मला हाक मारली. जरा त्रासूनच आजोबांच्या बेडजवळ मी पोहोचलो. तर आजोबांचं ऑक्सिजनचं प्रमाण निराशाजनक पातळीवर पोहोचलं होतं. आता आजोबांना वाचवता येणं जवळजवळ अशक्य होतं. इतर वेळी एखाद्या चमत्काराची वाट बघत थांबणं कदाचित शक्य झालं असतं, पण आता.. दुसऱ्या रूग्णाला मदतीची गरज होती. माझी नजर आजोबांच्या व्हेंटिलेटरवर गेली. त्या एका नाजूक धाग्याच्या आधाराने आजोबांचा जीव तग धरून होता. पण त्यांच्या जगण्याची आशा खूप कमी होती. आजींना व्हेंटिलेटर वाचवू शकला असता. मनावर दगड ठेवून मी मामांना म्हणालो, "पेशंटचा व्हेंटिलेटर काढून घ्या आणि माझ्याकडे आणून द्या. मी तोवर आजींना इंट्युबेट करतो." मामा हादरले होते, पण त्यांना माझा निर्णय पटवून देण्यासाठी माझ्याकडे वेळ नव्हता. मी आजींना इंट्युबेट करून आजोबांच्या व्हेंटिलेटरवर घेतलं. त्यांचं ऑक्सिजनचं प्रमाण हळूहळू वाढत गेलं. धोका टळला म्हणून मी निःश्वास टाकला तोच नर्सने मला खुणावलं. आजोबांचा श्वासोच्छ्वास जलद आणि उथळ होत गेला..आणि.. शेवटची प्राणांतिक धडपड करून त्यांचं शरीर निश्चल झालं. मी वळून आजींच्या मॉनिटरकडे पाहिलं, तर ऑक्सिजनचं प्रमाण योग्य पातळीवर आलं होतं. भरल्या डोळ्यांनी आजोबांकडे बघत मी उद्गारलो, "Time of death 5:40 am."

आई डोळे पुसत डॉक्टरचं बोलणं ऐकत होती. काय बोलून लेकराची समजूत घालावी, हे तिला कळेना. डॉक्टर बोलतच होता, "हे खूप अवघड आहे गं आई. पेशंट जाताना हताशपणे पाहणं. कसं करायचं हे रोज, कळत नाही मला." "असा नको विचार करू बेटा. जेमतेम विशीचा मुलगा तू. या अनुभवांतूनच स्वतःला मजबूत करायचं असतं." आई समजण्याचा, समजावून सांगण्याचा प्रयत्न करत होती. "नाही गं आई. बाकी अनुभव वेगळे. पण आपल्यासमोर, आपल्या प्रयत्नांना दाद न देता एक जीव जातो, तो नरक डॉक्टर सोडून कोणालाच नाही कळणार." डॉक्टर रूद्ध स्वरात बोलत होता. मग आई शांतपणे म्हणाली, "हेच तुझे अनुभव आहेत आणि याच ताकदीची तुझ्याकडून अपेक्षा आहे. जीव  जाण्याची भिती असताना जीव वाचवण्यासाठी झगडणं. हेच तर करायचंय डॉक्टर! आज दोन जीव तुझ्यादेखत जाऊ शकले असते. तुझ्या प्रसंगावधानामुळे आणि धैर्यामुळे आजींचा जीव वाचला. तुझी जबाबदारी तू निभावली आहे बेटा. मला तुझ्या कामाचा अभिमान वाटतो. असाच लढत रहा! " ते शब्द डॉक्टरला धीर देऊन गेले. फोन ठेवून त्याने जेवणाचा डबा उघडला. मेसच्या काकूंनी आज त्याची आवडती पाटवड्यांची आमटी भाकरी पाठवली होती आणि सोबत दोन आंबाबर्फी. मेसच्या फी ची चिठ्ठी उघडली आणि आतला मजकूर पाहून डॉक्टरचे डोळे पाणावले. काकूंनी या महिन्याची फी रद्द केली होती आणि सोबत लिहिलं होतं, "तुमच्यासारख्या डॉक्टर्समुळे मुंबई अजून व्हेंटिलेटरवर गेलेली नाही. आमचा तुमच्यावर विश्वास आहे. तुमच्या कामात आमच्याकडून ही छोटीशी मदत. तुमच्या सेवेसाठी धन्यवाद." डोळे पुसत डॉक्टरने जेवण संपवलं आणि तो बेडवरच्या उरलेल्या जागेत आडवा झाला. रोज कोरोनाच्या वाढत्या रूग्णसंख्येच्या स्वप्नांनी दचकून उठणारा डॉक्टर आज स्वस्थ झोपला. आज त्याच्या स्वप्नात आजोबा आले होते. त्यांची माफी मागण्यासाठी डॉक्टर खाली वाकला, तोच आजोबांनी त्याच्या खांद्याला धरून त्याला वर उचललं आणि त्याचे हात हातात घेऊन ते म्हणाले, "आमच्या हिला वाचवलंस बाळा तू. या युद्धसदृश परिस्थितीमध्ये अत्यंत अवघड निर्णय स्वतःच्या जबाबदारीवर तू घेतलास, म्हणून माझी बायको वाचली. तुझा ऋणी आहे मी, Thank you, Doctor!"

Legal note: In India, law currently prohibits ending active life support to a patient. The incident depicted in this story is purely fictional and it bears no resemblance to actual clinical practice whatsoever.